19 APR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनो, नोकरी देणारे बना

## प्र-कुलगुरू डॉ. पाटील : यिन समर यूथ समिटच्या पोस्टरचे अनावरण

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : 'विद्यार्थ्यांनी स्वतःचा उद्योग सुरू करून नोकरी देणारे बनावे,' असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी येथे केले. यिन समर यूथ समिटच्या पोस्टरचे त्यांच्या हस्ते नुकतेच अनावरण झाले, यावेळी ते बोलत होते. विद्यापीठातील प्र-कुलगुरूंच्या कार्यालयात कार्यक्रम झाला.



कोल्हापूर : 'सकाळ माध्यम समूहा'च्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्कतर्फे (यिन) आयोजित यिन समर यूथ समिटच्या पोस्टरचे अनावरण करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगले, यिन सहायक व्यवस्थापक अवधूत गायकवाड.

दरम्यान, 'सकाळ माध्यम समूहा'च्या 'यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क'तर्फे (यिन) याचे आयोजन केले होते. पुणे येथील स्वारगेट परिसरातील गणेश कला क्रीडा मंच येथे ११ व १२ जूनला हे समिट होणार आहे. डॉ. पाटील म्हणाले, 'महाविद्यालयीन काळातच विद्यार्थ्यांनी स्वतःला घडवले पाहिजे. करिअरला दिशा देण्याची हीच वेळ आहे. सामाजिक कार्यात राहून विद्यार्थ्यांनी देशाच्या जडणघडणीत योगदान द्यावे. 'यिन'नतर्फे नऊ वर्षांपासून समिटचे आयोजन केले जाते. तरुणाईतील नेतृत्व गुणाला आकार द्यावा, हा त्यामागचा उद्देश आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा येथील महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आवर्जून सहभागी व्हावे.'

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगले, 'यिन' सहायक व्यवस्थापक अवधूत गायकवाड, 'यिन' अधिकारी मोहन मोरे, 'यिन' गृहमंत्री शिवतेज देवणे, 'यिन' कार्याध्यक्ष साक्षी कुसाळे, उपाध्यक्ष गौरी यादव, 'यिन' अध्यक्ष पार्थ बोरवत, 'यिन' उपाध्यक्ष निरंजन सवणे, 'यिन' अध्यक्ष अभिषेक सूर्यवंशी, यिन कोर टीम अध्यक्ष अनुप कामत उपस्थित होते.


### अकरावी ते पदवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

अकरावी ते पदवीपर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना यात सहभाग नोंदविता येईल. सहभागींना वार्षिक स्मरणिका स्वरूपात असलेली दैनंदिनी, नामांकित वाईल्ड क्राफ्ट कंपनीची सॅक, ओळखपत्र, प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी 'यिन' सहायक व्यवस्थापक अवधूत गायकवाड (९९७५१३१२७०) यांच्याशी संपर्क साधावा.


### समिटमध्ये विविध विषयांवर सत्रे

समिटमध्ये 'सक्सेसफुल बिझनेस', 'टीम बिल्डिंग', 'युवा व राजकारण', 'सेलिब्रिटींशी संवाद', 'डिजिटल व ऑनलाइन मार्केटिंग आणि सायबर क्राइम', 'ऑनलाइन बँकिंग', 'स्टार्टअप : द नेक्स्ट बिग थिंग', 'इमेज बिल्डिंग', आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांशी संवाद, क्रीडा व करिअरविषयी मार्गदर्शन, प्रेझेंटेशन स्कील्स अशा विविध विषयांवर सत्रे होणार आहेत. देश-विदेशांतील तज्ज्ञ त्यात मार्गदर्शन करतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 APR 2024
पुढारी



डॉ. प्रतापसिंह जाधव



डॉ. अनिल काकोडकर

# प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराचे २५ रोजी वितरण

## दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांचा होणार सन्मान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने यंदाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांना राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मुंबईचे अध्यक्ष, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात गुरुवार, दि. २५ रोजी दुपारी ४ वाजता हा सोहळा होणार आहे. शाल, श्रीफळ, १ लाख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.


या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित राहणार आहेत. पुरस्काराचे हे नववे वर्ष असून, यापूर्वी व्यक्ती आणि संस्थांना पुरस्काराने सन्मानित केले आहे. यात भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव, रयत शिक्षण संस्था, दिग्दर्शक जब्बार पटेल, ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील, माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील, प्रा. डॉ. शिवाजीराव कदम यांचा समावेश आहे.

यावर्षीचा २०२४ चा पुरस्कार दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांना जाहीर झाला आहे. डॉ. जाधव यांचे १९८० पासून शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वाटचालीत मोलाचे योगदान आहे. त्यांच्याच पुढाकाराने विद्यापीठात ललित कला विभाग सुरू झाला आहे. देशातील पत्रकारितेतील पहिले डॉ. ग. गो. जाधव अध्यासन केंद्र उभारण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. एकंदरीतच शिवाजी विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासात त्यांचे सतत मोलाचे मार्गदर्शन राहिले आहे.

पत्रकारिता, सामाजिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत डॉ. जाधव यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 APR 2024
पुढारी

# प्राचार्य कणबरकर पुरस्काराचे २५ रोजी वितरण



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार' दै.'पुढारी'चे मुख्य संपादक, पद्मश्री डॉ. प्रतापसिंह गणपतराव जाधव यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार प्रदान सोहळा गुरुवार दि. २५ रोजी सायंकाळी ४ वाजता होणार असून, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ व एक लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे यंदाचे नववे वर्ष आहे. पत्रकारिता, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांसाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 APR 2024
तरूण भारत

# प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार वितरण गुरूवारी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने देण्यात येणारा यंदाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव यांना जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा, गुरूवारी, २५ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता राजर्षी शाहू सभागृहात पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. तरी या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी शिक्षण, सामाजिक क्षेत्रातील लोकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 APR 2024
सकाळ

# डॉ. अशोक चौसाळकर यांचा उद्या अमृतमहोत्सवी सत्कार

## शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेतर्फे आयोजन

■ सकाळ वृत्तसेवा



डॉ. चौसाळकर

कोल्हापूर, ता. १८ : ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा सत्कार शनिवारी (ता. २०) सायंकाळी साडेपाच वाजता शाहू स्मारक भवनमधील मिनी हॉलमध्ये होणार आहे. शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद आणि विचारशलाका त्रैमासिक लातूर यांच्यातर्फे आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर ज्येष्ठ इतिहासकार प्रा. डॉ. जयसिंगराव पवार प्रमुख उपस्थित असणार आहेत.


डॉ. चौसाळकर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त भारतीय लोकशाही आव्हाने व भविष्य या विषयावरील विशेषांक आणि गौरवांकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख वक्ते ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. गोपाळ गुरू, किशोर बेडकिहाळ, प्रबोधन प्रकाश ज्योतीचे संपादक प्रसाद कुलकर्णी विचार मांडणार आहेत, अशी माहिती विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. शिवाजी पाटील, 'विचारशलाका'चे संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 APR 2024
लोकमत

# चौसाळकर यांचा अमृतमहोत्सवी सत्कार उद्या

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांचा उद्या,



शनिवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी डॉ. चौसाळकर यांच्यावरील विचारशलाका लोकशाही व गौरवांकाचे प्रकाशनही होणार आहे.

शाहू स्मारकच्या मिनी सभागृहात सायंकाळी ५:३० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाला ज्येष्ठ इतिहासकार प्रा. डॉ. जयसिंगराव पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी दिल्लीच्या जे.एन.यू.तील प्रा. डॉ. गोपाळ गुरू, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ व प्रसाद कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती असेल. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन विचारशलाकाचे संपादक प्राचार्य डॉ. नागेश कुंभार व शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. शिवाजी पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 APR 2024
तरुण भारत

# ज्येष्ठ विचारवंत डॉ. चौसाळकर यांचा उद्या अमृतमहोत्सवी सन्मान

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र परिषद आणि विचारशलाका त्रैमासिक यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या २० एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता दसरा चौकातील शाहू स्मारक भवन येथे ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचा अमृतमहोत्सवानिमित्त सत्कार करण्यात येणार आहे. तसेच विचारशलाका लोकशाही विशेषांक व गौरवांकाचे प्रकाशन केले जाणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार उपस्थित राहणार आहेत.

दिल्लीतील जेएनयूचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. गोपाळ गुरू, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ, प्रसाद कुलकर्णी प्रमुख वक्ते आहेत. तर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. तरी जास्तीत जास्त लोकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राज्यशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. शिवाजी पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 APR 2024
लोकमत

# न्यू कॉलेजमध्ये ग्रंथप्रदर्शन उत्साहात

कोल्हापूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेजमध्ये एच. टी. अपराध ग्रंथालय विभागाच्यावतीने ग्रंथप्रदर्शन पार पडले. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन यांच्यां हस्ते उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानीं प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील होते. यावेळी डॉ. आर. डी. ढमकले, डॉ. एन. व्ही. पवार, प्रा. के. डी. कांबळे, प्रा. एस. एन. इनामदार उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. आर. पी. आडाव यांनी संयोजन केले.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 APR 2024
सकाळ

# विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागात इशरे स्टुडंट्स चॅप्टरला सुरुवात

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात इशरे (इंडियन सोसायटी ऑफ हिटिंग रेफ्रिजरेटिंग अँड एयर कंडिशनिंग इंजिनिअर्स) कोल्हापूर स्टुडंट्स चॅप्टरला सुरुवात झाली. 'इशरे'चे अध्यक्ष अनुप बलानिजी यांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन झाले.

बलानिजी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत हिटिंग आणि रेफ्रिजरेशन विषयासंदर्भात मार्गदर्शन केले. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी, घरातील हवा गुणवत्ता सुधारण्यासाठी, ऊर्जा संवर्धनला मदत करण्यासाठी, एसव्हीएसीमधील सतत शिक्षण देण्यासाठी, स्थानिक महाविद्यालये व संस्थांमधील विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन करण्यासाठी इशरे विविध उपक्रम आयोजित करीत असल्याचे स्पष्ट केले. चॅप्टरतर्फे विद्यार्थ्यांना उपलब्ध होणाऱ्या संधींबाबत माहिती दिली. इशरे स्टुडंट्स चाप्टरचे तंत्रज्ञान अधिविभागातील डॉ. एस. एन. सपली व सहायक प्रा. सागर पोलेकर काम पाहणार आहेत. मनीष गुलालकरी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा शपथविधी झाला. यात विद्यार्थी अध्यक्ष निशांत सूर्यवंशी, उपाध्यक्ष गायत्री गोखले, खजिनदार हृषिकेश पदमन, सचिव साई तोडकरी व इतर कमिटीत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. याप्रसंगी रिजनल डायरेक्टर वेस्ट-१चे मनीष गुलालकरी, इशरेचे कोल्हापूर चॅप्टरचे अध्यक्ष प्रमोद पुणगावकर, माजी अध्यक्ष सुरेश पाटील उपस्थित होते. तंत्रज्ञान अधिविभागातील डॉ. अजित कोळेकर, डॉ. प्रवीणकुमार पाटील उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित इशरे कोल्हापूर स्टुडंट्स चॅप्टरमध्ये सहभागी पदाधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी.

19 APR 2024 पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्र पदवी, पदव्युत्तर परीक्षेला ५,१२९ विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला ५ हजार १२९ विद्यार्थी बसले, त्यापैकी ५७२ विद्यार्थी अनुपस्थित होते.

विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने उन्हाळी सत्र परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. गुरुवारी मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ आर्टस्, मास्टर ऑफ कॉमर्स, मास्टर ऑफ इकोनॉमिक्स, मास्टर ऑफ लायब्ररी सायन्स, बॅचलर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ रूरल स्टडीज, मास्टर ऑफ फाईन आर्टस्, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ सोशल वर्क आदी २२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये झाल्या.

परीक्षेसाठी विद्यापीठाच्या भरारी पथकाकडून १८ एप्रिल रोजी सातारा (१), कोल्हापूर (५) असे मिळून सहा गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत झाली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 APR 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ परीक्षेत ६ कॉपीचे प्रकार उघडकीस

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. गुरुवारी झालेल्या २२ विषयांच्या परीक्षेला ५ हजार १२९ पैकी ४ हजार ५५७ विद्यार्थी उपस्थित होते. तर ५७२ विद्यार्थी अनुपस्थित होते. भरारी पथकाकडून कोल्हापूर ५, सातारा-१ असे दोन जिल्ह्यातून ६ कॉपीच्या प्रकारांची नोंद केली आहे. परीक्षा प्रमाद समितीसमोर सुनावणी होऊन गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई केली जाणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी नियमांच्या अधीन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.